एसएमएस
तुम्ही जसे आहात तसेच राहा...
कारण, 'ओरिजिनल'ची किंमत
नेहमीच 'कॉपी'पेक्षा जास्त असते.

निवडक लेख, बातम्या मिळवा
व्हॉट्सॲपवर!
आपला मोबाईल नंबर SMS ने नोंदवा
9922421511

# सत्ता राखण्यास नेत्यांना यश

## ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंचपदी तरुणांना संधी; काही ठिकाणी प्रस्थापितांना धक्का

**पुणे, ता. २७ :** जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या पंचवार्षिक निवडणुकीत राज्य आणि जिल्हा पातळीवरील नेत्यांना आपापल्या गावाची सत्ता राखण्यात यश आले आहे. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून गावाची सूत्रे सातत्याने स्वतःच्या हातात कायम ठेवणाऱ्या प्रस्थापित गावपुढाऱ्यांना मतदारांनी सपशेल नाकारले आहे. अनेक गावांमध्ये प्रस्थापितांना झिडकारून सत्तेची सूत्रे तरुणांच्या हातात दिली आहेत.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार (काटेवाडी, ता. बारामती), माजी विधानसभा अध्यक्ष, आमदार दिलीप वळसे पाटील आणि जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील (निरगुडसर, ता. आंबेगाव), भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब गावडे (पारवडी, ता. बारामती), राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा परिषदेतील गटनेते आणि माजी उपाध्यक्ष शरद लेंडे व आमदार शरद सोनवणे (पिंपळवंडी, ता. जुन्नर) आणि शिवसेनेच्या जिल्हा परिषदेतील गटनेत्या आशा बुचके (बुचकेवाडी, ता. जुन्नर) आदी नेत्यांना आपापल्या गावाची सत्ता कायम राखण्यात किंवा नव्याने मिळविण्यात यश आले आहे. पिंपळवंडी ग्रामपंचायतीत लेंडे आणि आमदार सोनवणे यांनी एकत्र येत, सर्वपक्षीय पॅनेल स्थापन केला होता. या पॅनेलला यश आले आहे. त्यामुळे या दोन्ही नेत्यांची पिंपळवंडीत संयुक्त सत्ता असणार आहे.

येत्या फेब्रुवारीअखेर मुदत संपत असलेल्या जिल्ह्यातील ९९ ग्रामपंचायतींच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान झाले. बुधवारी मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात आले. निवडणूक झालेल्या एकूण ग्रामपंचायतींपैकी निम्म्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतीत राष्ट्रवादी काँग्रेसने सत्ता काबीज केली आहे. काँग्रेस दुसऱ्या तर, केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असलेला भारतीय जनता पक्ष तिसऱ्या क्रमांकावर आहे.

दरम्यान, अनेक ठिकाणी सरपंच एका गटाचा आणि ग्रामपंचायत सदस्यांचे बहुमत दुसऱ्या गटाकडे, असे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे अशा ग्रामपंचायतींमध्ये सरपंचांना निर्णय घेताना मोठी कसरत करावी लागणार आहे.

### काटेवाडीत राष्ट्रवादीचाच झेंडा!

**बारामती, ता. २७ :** संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या काटेवाडी (ता. बारामती) ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत भवानीमाता पॅनेलने एकतर्फी विजय मिळवत १५ पैकी १४ जागा पटकावल्या. सरपंचपदी राष्ट्रवादीचे विद्याधर श्रीकांत काटे हे १५९२ मताधिक्याने निवडून आले.

भाजप- रासप पुरस्कृत लोकशाही परिवर्तनवादी पॅनेलला मात्र एकही जागा मिळाली नाही.

काटेवाडी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत सरपंचपदासाठी सहा उमेदवार उभे होते. लढत मात्र राष्ट्रवादीच्या विद्याधर काटे व भाजप-रासप युतीच्या पांडुरंग कचरे यांच्यात झाली. यामध्ये कचरे यांना १४६३ मते मिळाली, तर काटे यांना ३ हजार ५५ मते मिळाली. या निवडणुकीत विरोधकांच्या पॅनेलला एकही जागा मिळवता आली नाही.

या निवडणुकीत राष्ट्रवादी पुरस्कृत भवानीमाता पॅनेलचे विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे- राजू लक्ष्मण भिसे, हेमलता अमोल जगताप, प्रियांका प्रदीप देवकाते, समीर अजमुद्दीन मुलाणी, राहुल विलास काटे, शीतल अमोल काटे, नितीन लव्हा भिसे, धीरज लक्ष्मण घुले, रंजना लक्ष्मण लोखंडे, संजीवनी दत्तात्रेय गायकवाड, स्वाती संतोष लकडे, श्रीधर आनंद घुले, स्वाती अजित गडदरे व पद्मिनी पोपट देवकर.

#### 'विकासकामांचा विजय'

**या विजयानंतर राष्ट्रवादीच्या नवनिर्वाचित सदस्यांचा सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. या वेळी त्या म्हणाल्या, ''काटेवाडीत ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या विकासावर मतदारांनीही शिक्कामोर्तब केले. विरोधकांना कोणतेही मुद्दे नसल्याने त्यांनी खालच्या पातळीवर जाऊन केलेला प्रचारही राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी संयमाने हाताळला. विकासकामे जनतेपर्यंत पोचविण्यात कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. विकासाला काटेवाडीकरांनी मत दिले.''**



**बारामती : तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या काटेवाडीसह उर्वरित ग्रामपंचायतींवर राष्ट्रवादी काँग्रेसने विजय संपादन केल्याचे जाहीर होताच कार्यकर्त्यांनी केलेला जल्लोष.**

'सकाळ संवाद' डाउनलोड करा...

सकाळ संवाद

१. आपल्या मोबाईलमधील Google Play Store वर टाइप करा: Sakal Samvad
२. डाउनलोड करा 'सकाळ संवाद' मोबाईलमध्ये!

'सकाळ संवाद'साठी क्लिक करा
https://goo.gl/2llu9q

इन्स्टॉल करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

माझे नाव...माझी बातमी
आपले नाव, आडनाव, वेगळ्या नावाने संवाद साधायचा असल्यास तसा तपशील आवर्जून प्रोफाईलमध्ये नोंदवा.

Publish with

व्हॉट्सॲपवरही बातमी पाठवा
९१३००८८४५९

### रस्त्यावरील गाड्या हटवा



दांडेकर पूल परिसर म्हणजे रोजच मरणयातना सोसाव्या लागणारा रस्ता. चारही बाजूंना पोलिस उभे असतानाही वडापावची दुकाने सर्रास रस्त्यालगत थाटली जातात. यावर कारवाई केली तरी कोंडी फुटेल. याची दखल घेऊन कारवाई करावी.

– **विजय देडगे**

### जरब बसेल असा दंड लावा

शहर सुंदर बनविताना पुणेरी कलाकुसर दिसावी. कुठेही चिकटविलेले पोस्टर्स काढण्याबरोबरच अशा जाहिराती लावणाऱ्यांकडून साफ करून घेतल्या पाहिजेत. तसेच जरब बसेल असा दंड आकारला जावा, जेणेकरून हा प्रकार बंद होईल.

– **कैलास टिळे**

### नागरिकांची सर्रास लूट

आयनॉक्स बंडगार्डन येथील कॅन्टीनमध्ये सामान्य कोकाकोला आणि लाह्यांची किंमत ३५० रुपये आहे. एमआरपी कायदा झोपला का? प्रशासन काय करतंय?

– **महेश परदेशी**

### प्राथमिक उपचाराचे धडे

'शिल्पकार फ्रेंड्स सर्कल'तर्फे रस्त्यावर फिरणारे मोकाट कुत्री, अपघातग्रस्त कुत्री, पक्षी यांच्यावर उपचार करण्याची किंवा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची मदत घेण्याची माहिती दिली.

– **आकाश पगारे**

### अनधिकृत होर्डिंग्जचा सुळसुळाट

नगर रस्त्यावर अनेक ठिकाणी अनधिकृत होर्डिंग्ज उभारण्यात आली आहेत. खराडी नदीपात्र, कल्याणीनगर नदीपात्र, रामवाडी या ठिकाणी महापालिकेच्या जागेवर अनेक अनधिकृत होर्डिंग्ज उभारली गेली. काही लोक मनपा अधिकाऱ्यांना हाताशी धरून शहर विद्रूप करण्याचा प्रयत्न करीत आहेत. याची क्षेत्रीय कार्यालयाने दखल घेऊन त्वरित कारवाई करावी.

– **एक नागरिक**

### अपघात टाळण्यासाठी स्वयंशिस्त पाळा

हल्ली बरेच लोक वाहन चालवताना मोबाईलवर बोलत असतात. बरीच मंडळी हेडफोन लावून गाणी ऐकत दुचाकी किंवा मोटार चालवितात. त्यामुळे इतर वाहनांचे हॉर्न ऐकू न आल्याने किंवा त्यांनी दिलेले सिग्नल न कळल्याने गंभीर अपघात होत आहेत. याबाबत पोलिसांनी कारवाई करावी असे म्हणण्यापेक्षा लोकांनी स्वयंशिस्त अंगी बाणावी, असे वाटते.

– **परेश लाड**

# पॅनेल जिंकले; सरपंचपद गमावले

## वाघोली ग्रामपंचायत निवडणुकीत 'ग्रामविकास'ची बाजी



**वसुंधरा उबाळे**

**वाघोली, ता. २७ :** वाघोली ग्रामपंचायत निवडणुकीत ग्रामविकास पॅनेलने १७ पैकी नऊ जागांवर विजय मिळविला. मात्र, त्यांना सरपंचपद गमवावे लागले. सरपंचपदी वाघेश्वर पॅनेलच्या वसुंधरा उबाळे यांनी ५० मतांची आघाडी घेत मीना सातव यांचा पराभव केला. वाघेश्वर पॅनेलने सात जागांवर विजय मिळविला. कविता दळवी या विद्यमान सदस्या विजयी झाल्या, तर मच्छिंद्र सातव व स्वाती सातव हे विद्यमान सदस्य पराभूत झाले. अपक्ष उमेदवार श्रीकांत वाघमारे हे विजयी झाले, तर काळभैरवनाथ पॅनेलचा दारुण पराभव झाला.

वाघेश्वर पॅनेल, वाघोली ग्रामविकास पॅनेल व काळभैरवनाथ पॅनेलमध्ये लढत झाली. माजी जिल्हा परिषद सदस्या अर्चना कटके या वॉर्ड क्रमांक पाचमधून विजयी झाल्या, तर विद्यमान सदस्य समीर भाडळे यांच्या पत्नी पूजा भाडळे वॉर्ड क्रमांक एकमधून, तर माजी सरपंच रामदास दाभाडे यांच्या वहिनी वंदना दाभाडे वॉर्ड क्रमांक दोनमधून विजयी झाल्या. पोलिस पाटील पदाचा राजीनामा देऊन निवडणूक लढविलेले रामकृष्ण सातव हे वॉर्ड क्रमांक तीनमधून विजयी झाले. सदस्यांमध्ये सर्वाधिक पूजा भाडळे यांना २९०० मते मिळाली, तर सर्वांत कमी अपक्ष उमेदवार गणेश पवार यांना ४१ मते मिळाली. सर्वाधिक चुरस सरपंचपदासाठी व वॉर्ड क्रमांक सहामध्ये होती. वॉर्ड क्रमांक सहामध्ये ग्रामविकास पॅनेलच्या तिन्ही उमेदवारांनी विजय मिळविला. निवडून आलेल्या उमेदवारामध्ये विद्यमान सदस्या कविता दळवी व माजी सरपंच शिवदास उबाळे वगळता सर्व चेहरे ग्रामपंचायतीवर प्रथमच निवडून आले आहेत. सरपंचपदी विजयी झालेल्या वसुंधरा उबाळे या हवेली पंचायत समितीच्या माजी सभापती आहेत. त्यांचे पती माजी सरपंच शिवदास उबाळे विजयी झाले.

**विजयी उमेदवारांची नावे व त्यांची मते कंसात –**

सरपंच : वसुंधरा उबाळे (८७६६)
सदस्य : शिवदास उबाळे (२५०३), पूजा भाडळे (२९००), महेंद्र भाडळे (२५६७) विजय भाडळे (१३१६), वंदना दाभाडे (१३८१), रामकृष्ण सातव (२०२६), रेश्मा पाचारणे (२०९२), रोहिणी गोरे (२२१४), कविता दळवी (१५३०), सुनीता सातव (१६४३), श्रीकांत वाघमारे (११८९), मारुती गाडे (१४४८), जयप्रकाश सातव (११८५), अर्चना कटके (१३५०), संदीप सातव (२१६०), मालती गोगावले (२२७३), जयश्री काळे (१९८१).

**फेर मतमोजणी करा**

सरपंचपदाच्या उमेदवार मीना सातव यांचा केवळ ५० मतांनी पराभव झाल्याने त्यांचे पती व विद्यमान सदस्य संजय सातव यांनी फेर मतमोजणीची मागणी केली होती. फेर मतमोजणीत वसुंधरा उबाळे याच ५० मतांनी विजयी ठरल्या.



**वाघोली : ग्रामपंचायत निवडणुकीत विजय मिळविल्यानंतर जल्लोष करताना 'ग्रामविकास'चे कार्यकर्ते.**

# निकालापूर्वीच फ्लेक्स !

**वाघोली :** निवडणूक निकालापूर्वीच सरपंचपदी मीना संजय सातव निवडून आल्याचे व वाघोली ग्रामपंचायतीवर भगवा फडकल्याचे फ्लेक्स वाघोलीत बुधवारी पहाटेच लावण्यात आले होते. हे फ्लेक्स सकाळी चर्चेचा विषय ठरले. कार्यकर्त्यांचा अतिउत्साह टिकेल की नाही, याचीही मोठ्या प्रमाणावर चर्चा होती. मात्र, हा अतिउत्साह निकालात टिकला नाही. मीना सातव यांचा ५० मतांनी पराभव झाला. ग्रामविकासच्या मीना सातव या निवडून येतील, असा आत्मविश्वास बाळगून शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी अनेक ठिकाणी ग्रामपंचायतीवर भगवा फडकल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले.





**वाघोली : मतमोजणीपूर्वीच सरपंचपदाच्या उमेदवार मीना सातव यांच्या विजयाचे बुधवारी पहाटे लावलेले प्लेक्स.**

त्वचाविकार

सोरिआसिस, पांढरे डाग, शितपीत्त, एक्झिमा, गजकर्ण, हाता पायांना भेगा, त्वचेवरील काळे/लाल डाग, पुरळ, ॲलर्जी, खाज, कोंडा, फोड, पिंपल्स, नायटा, न भरणाऱ्या जखमा इ. सर्व त्वचा विकारांसाठी आयुर्वेदिक औषधि व पंचकर्म उपचार.

ॐकार आयुर्वेद
डॉ.सत्यन गुजर
आयुर्वेदाचार्य

पुणे : 2 रा मजला, खजिना महाल, 1471, सदाशिवपेठ, एस. पी. कॉलेज समोर, टिळक रोड. फोन : 020-24430518/9, 9822199851 वेळ : स.11 ते 2 व संध्या. 6 ते 9

केसांच्या समस्या वेळीच थांबवा!

consultation & Trichoscaning
₹1700/- Now only ₹300/-
ONLY FOR 3 DAYS

First 50 Patients only

International ROOT GROW THEROPY Available Only in HAIRDOC

Before Treatment | During Treatment | After Treatment

30 YEARS OF HEALTHY HAIR EXPERIENCE

हेअर डॉक हेअर क्लिनीक
एफ. सी. रोड, पुणे: 9923049310
सविस्तर माहितीसाठी
020-66215900

HAIR DOC TRICHOLOGY EXPERT
An ISO:9001-2008 Certified HAIR CLINIC

*Conditions apply Individual results may vary
जनहितार्थ जारी

शाखा: औरंगाबाद व नाशिक WEDNESDAY CLOSED

सकाळ
सन्मान शेतकऱ्याचा, अभिमान महाराष्ट्राचा!

ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्ड्स २०१७

शेतात घाम गाळून पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या कष्टांची दखल घेत, त्यांना सन्मानित करणारा दिमाखदार भव्य सोहळा!

~ पुरस्कार वितरण ~
दिनांक : २९ डिसेंबर २०१७
स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे
वेळ : सायंकाळी ४ ते ७
आवर्जून या!

*प्रथम येणाऱ्यास प्राधान्य आणि काही जागा राखीव

सकाळ ॲग्रोवन

ऋषिकेश रानडे
मृणमयी देशपांडे
समिरा गुजर
योगेश शिरसाट
प्रियांका बर्वे
सुहास परांजपे
अतुल तोडणकर

या कलाकारांच्या संगतीत रंगणार
ॲग्रोवन पुरस्कार सोहळा!

प्रायोजक
सोनाई पशु आहार
UPL
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.
महाधन एक अतूट नातं!
बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra एक परिवार एक बँक
ओरिएण्टल इंश्योरेंस Oriental Insurance
चौधरी यात्रा कंपनी प्रा.लि.